निशाणी क्र.२७

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.६ चा सरतपास</u> –**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – ज्ञानेश्वर शत्रुघ्न सोळंके,

वय – ३४ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणुक – निलंगा पोलिस स्टेशन, ता.निलंगा, जि. लातूर.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एन.मेहेत्रे यांचे मार्फत सुरुः</u>–**

मी ०१/०१/२०२६ पासून निलंगा पो.स्टे. येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत आहे. गुन्हा रजिस्टर नंबर ९३/२०२६ चा तपास दिनांक ०६.०४.२०२६ रोजी माझ्याकडे दिला होता. सदरचा गुन्हा बी.एन.एस. कलम ३३१(३) आणि ३०५(अ) अन्वये नोंद होता. तपास माझ्याकडे दिला तेव्हा तपास एफ.आय.आर., फिर्याद, खासवर्दी अहवाल आणि सोन्याच्या पावत्या दिल्या होत्या.

२. सदर गुन्हयाचा तपास माझ्याकडे आल्यानंतर फॉरेन्सीक तज्ञ आणि अंगुली तज्ञ यांच्या मदतीने दोन पंचांच्या समक्ष फिर्यादी यांच्या ब्राईट गिरजा नगरी, दापका या ठिकाणी गेलो होतो. तेथे पंचांच्या समक्ष घटना ठिकाणचा पंचनामा केला. तो पंचनामा दाखवल्यास मी ओळखु शकतो. (आता मला प्रस्तुत कामातील निशाणी २३ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला.) तो पंचनामा मी दोन पंचांच्या समक्ष केलेला घटनास्थळ पंचनामा आहे. त्याच्यावर दोन पंचांच्या आणि माझी सही आहे. त्या सह्या मी ओळखतो.

३. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपीचा शोध घेतला. त्यानंतर मी निलंगा येथील सराफा असोसिएशन यांना पत्र दिले. त्या पत्राची एक प्रत मी प्रस्तुत कामात दाखल केली आहे. (आता मला पस्तुत दोषारोप पत्रासोबत दाखल केलेले दि. २२.०४.२०२६ रोजीचे नोटीस दाखवण्यात आले.) ती नोटीस मी सराफा असोसिएशन, निलंगा यांना दिलेली नोटीस आहे. त्यामधील मजकूर खरो व बरोबर आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे.

४. स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी आरोपीस गुन्हा रजिस्टर नंबर १३७/२०२६ मध्ये मुद्देमालासह हजर केले. त्यानुसार आरोपीस गुन्हा रजिस्टर नंबर १३७/२०२६ मध्ये अटक केली होती. गुन्हा रजिस्टर नंबर १३७/२०२६ मध्ये आरोपीने प्रस्तुत गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल दिला होता.

५. स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीकडून पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी आणि पाचशे रुपयाच्या २० नोटा असे १०,०००/- रुपयांचा मुद्देमाल निलंगा पोलिस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ९३/२०२६ मध्ये जप्त केला होता. तसेच, सोन्याच्या आठ अंगठ्या, सोन्याच्या दोन राख्या व कानातील एक झुमक्याचा जोड देखील आरोपीकडून स्थानिक गुन्हे शाखेने जप्त केला होता. तो सर्व मुद्देमाल जप्त केलेला मुद्देमाल पोलिस स्टेशनच्या मुद्देमाल कारकुनाकडे जमा केलेला होता.

६. स्थानिक गुन्हे शाखेच्या साक्षीदार पोलिसांची तपास टिप्पन नोंदवले. गुन्हा

रजिस्टर नंबर १३७/२०२६ मध्ये तपासी अधिकारी यांच्याकडून जप्ती पंचनाम्याची सत्यप्रत घेऊन प्रस्तुत दोषारोप पत्रात सामील केली. ती प्रत निशाणी २६ वरील प्रत आहे.

७. तपासामध्ये आरोपीने फिर्यादीच्या घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन पाच ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, रोख रक्कम रुपये १७,०००/- चोरी केल्याचे निष्पन्न झाले म्हणून मी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी आज न्यायालयात व्ही.सी.द्वारे हजर आहे. मला तो चोरीतील मुद्देमाल दाखवल्यास मी ओळखु शकतो.(आता मला प्रस्तुत गुन्हयातील मुद्देमाल व्ही.एम.आर नं.६९/२०२६ मधील जप्त एक अंगठी व रुपये १०,०००/- दाखवण्यात आले.) तो मुद्देमाल आरोपीकडून जप्त केलेल्या मुद्देमालातील आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे अॅड. के.एन.पवार यांच्यामार्फेत शपथेवर सुरु-</u>**

८. पोलिस अभिलेखासाठी एम. आर. नंबर ३२/२०२६ या यादीमधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यामधील ०९.०८.२०२५ ही तारिख चुकीची आहे. आरोपीची ओळख परेड झाली होती. मी टेलरचे तपास टिपण नोंदवले नाही. आरोपीकडून जप्त केलेल्या नोटा सिल बंद केलेल्या होत्या. जप्त केलेली अंगठी आणि नोटा फिर्यादीच्या मालकीच्या आहेत हे फिर्यादी आणि फिर्यादीच्या पत्नीने ओळखले होते. नोटांचे नंबर घेतले नव्हते. फिर्यादीकडे एवढी मोठी रक्कम कशी आली याची चौकशी केली होती. ती रक्कम त्यांनी बचत केलेली रक्कम होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला खोट्या गुन्ह्यात गुंतवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. घटनास्थळ पंचांना मी लेखी नोटीसीने बोलवले नव्हते. मी फिर्यादीच्या घराचे कुलूप

जप्त केले नव्हते. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले होते. फॉरेन्सीक तज्ञ आणि अंगुली तज्ञ यांच्याकडून आरोपींच्या घरातून कोणताही पुरावा मिळुन आला नाही. घटनास्थळ पंचनाम्यामध्ये शेवटच्या परिच्छेद मध्ये तारखेमध्ये खाडाखोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा घटनास्थळ पंचनामा केला आहे.

**न्यायालयाची मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब.**

**सदर साक्षीदारचा जबाब आरोपीस व्ही.सी द्वारे हजर केल्यानंतर नोंदवण्यात आला. सदर जबाब नोंदवतेवेळी ऑडिओ व व्हीडीओ सुस्थितीत चालु होता.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.07.31 17:38:32 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–३१/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा

**पुढील उलटतपास आरोपीतर्फे अॅड. के.एन.पवार यांच्यामार्फेत शपथेवर सुरु–**

९. हे म्हणणे खरे नाही की, मी खरे आरोपी शोधलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी अंगझडती पंचनामा केलेला नाही. आरोपी यानेच तो गुन्हा केला आहे असा पुरावा मला घटनास्थळावरुन मिळून आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी गुन्ह्याचा तपास योग्य केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोट्या गुन्हात तपास करुन दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जबाबातील मजकूर चुकीचा

आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**सदर साक्षीदारचा जबाब आरोपीस व्ही.सी द्वारे हजर केल्यानंतर नोंदवण्यात आला. सदर जबाब नोंदवतेवेळी ऑडिओ व व्हीडीओ सुस्थितीत चालु होता.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2026.07.31 17:38:25 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–३१/०७/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,

निलंगा